'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

✻ वर्ष २ रे ✻ अंक ३३ वा ✻ रविवार दि. १८ मे २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## पक्षांतरबंदी कायदा रद्द करा : चव्हाण

**पुणे :** मुळातच दुबळ्या असलेल्या पक्षांतरबंदी कायद्यामुळे राज्यातील कौटुंबिक पक्षांची परिस्थिती काय झाली आहे, हे दिसतच आहे, असे मत व्यक्त करून पक्षांतरबंदी कायदा रद्द करण्याची मागणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली.पुणे पत्रकार कट्टाफच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पृथ्वीराज चव्हाण बोलत होते. निवृत्त न्यायाधीश बी. जी. कोळसे पाटील, लेखिका इंदुमती जोंधळे, डॉ. संजय तांबट, सरहद संस्थेचे संजय नहार, संजय आवटे आदी उपस्थित होते.

## ड्रग्ज पाठोपाठ लाखो रुपयांचा गांजा पकडला



**श्रीरामपूर :** शहर पोलिसांनी बुधवारी रात्री एम आय डी सी परिसरात छापा टाकून १३ कोटी ७५लाख, ४१हजार रुपये किंमतीचा अल्प्राझोलम बनवण्याचा कच्चा माल पडकल्याची घटना ताजी असतानाच शहर पोलिसांनी दुसऱ्या दिवशी पुन्हा लाखो रुपयांचा गांजा पकडल्याने श्रीरामपुर गांजा व इतर अमली पदार्थांच्या तस्करीचे केंद्र होते की काय अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

दि. १५ मे रोजी रात्री खैरी निमगाव ते श्रीरामूपर रोडवर एका काळया रंगाच्या महींद्रा एक्स यु.व्ही. ५०० गाडीमधुन गांजाची वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिस उपअधीक्षक डॉ.बसवराज शीवपुजे, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख,सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, उपनिरीक्षक रोहिदास ठोंबरे,समाधान सोळंके, दिपक मेढे,शरद अहिरे,संपत बडे,अमोल पडोळे, अमोल गायकवाड,संभाजी खरात, मच्छिंद्र कातखडे,अजित पटारे, अकबर पठाण, सागर बनसोडे,आजिनाथ आंधळे, रामेश्वर तारडे, सचिन दुकळे, रविंद्र शिदे, **(पान २ वर)**

# श्रीरामपूरमध्ये १४ कोटींचे अमली पदार्थ जप्त

## वाहन चालकास अटक; २० मे पर्यंत पोलीस कोठडी

**श्रीरामपूर :** शहरातील पोलिसांनी केलेल्या कारवाईत १३ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपये किमतीचा ४०८ किलो अल्प्राझोलम हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. या संदर्भात एका टेम्पोचालकाला अटक करण्यात आली असून, पुणे जिल्ह्यातील एका रसायन अभियंत्याविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिनीनाथ विष्णू राशिनकर (वय ३८, धनगरवाडी, राहाता, अहिल्यानगर) या वाहन चालकाला अटक करण्यात आली आहे, तर विश्वनाथ कारभारी शिपणकर (रा. दौंड, पुणे) याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी



श्रीरामपूरमध्ये दिली. या वेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, श्रीरामपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे आदी उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यात सुमारे १४ कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्याची ही पहिलीच कारवाई आहे. अटक केलेल्या राशिनकर याला न्यायालयाने दि. २० पर्यंत कोठडी सुनावली.

श्रीरामपूर एमआयडीसी परिसरात छोट्या मालमोटारीतून अमली पदार्थांची वाहतूक होणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी डॉ. शिवपुजे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्यासह पथकाला शोध घेण्यास सांगितले. काल, बुधवारी सायंकाळी श्रीरामपूर दिघी-खंडाळा रस्त्यावर ही छोटी मालमोटार (एमएच २० बीटी ९५१) **(पान २ वर)**


### बंदी घातलेला पदार्थ

उपविभागीय अधिकारी डॉ. शिवपुजे यांनी दिलेल्या माहितीनुसार अल्प्राझोलम हा अमली पदार्थ म्हणून गणला जातो. तो हाताळण्यास व वापरास बंदी आहे. त्याचा वापर झोपेच्या गोळ्या तयार करण्यासाठी केला जातो. हा माल कुठे उत्पादित करण्यात आला याचा तपास केला जात आहे.


### यापूर्वी औषध कंपनीत काम

मिळालेल्या माहितीनुसार, रसायन अभियंता विश्वनाथ शिपणकर हा यापूर्वी एका औषध कंपनीत काम करत होता, असे समजले. अटक केलेला वाहनचालक त्याचा नातेवाईकच असल्याची माहिती मिळाली. शिपणकर दौंडमध्ये राहतो. दौंड एमआयडीसीमध्ये ही पोलिसांनी यापूर्वी कारवाई करत अमली पदार्थ जप्त केले होते. आता श्रीरामपूर एमआयडीसीत जप्त करण्यात आले.

**नवी कोरी पुस्तकं**




**कमळकाचा**
: लेखकाचे नाव :
**सुमती लांडे**
किंमत रु. : ३९०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर




**लोकमानस**
: लेखकाचे नाव :
**डॉ. सुनंदा रेवसे**
किंमत रु. : २५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

# उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा

## ना. विखे पाटील : सन २०२५-२६ खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठक

**अहिल्यानगर :** शेती अधिक शास्त्रशुद्ध, फायदेशीर व पर्यावरणपूरक बनावी यासाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती पद्धतीत बदल करून कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शेतीसाठी उपयुक्त माहिती शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सन २०२५ -२६ खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठकीत पालकमंत्री



श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार अमोल खतले, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अहिल्यानगरचे अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी उपस्थित होते. **(पान २ वर)**

# संगमनेर येथे ३८ वेठबिगार, ३१ बालकामगारांची मुक्तता

### जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार प्रशासनाची धडक कारवाई

**संगमनेर :** अहिल्यानगर – संगमनेर तालुक्यातील शेंडेवाडी, साकूर, पिंपळगाव, कवटे मलकापूर व कर्जुले पठार येथील दगडखानीवर काम करणाऱ्या ३८ वेठबिगार कामगार व ३१ बालकामगारांची मुक्तता करण्यात आली. मुक्तता करण्यात आलेल्या ३८ वेठबिगार कामगारांत २२ पुरूष व १६ महिला कामगार आहेत. ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना आज सकाळी प्राप्त झालेल्या तक्रारीवर प्रशासनाने ही तत्परतेने कारवाई केली आहे.

मुक्तता करण्यात आलेले सर्व वेठबिगार व बालकामगार पालघर जिल्ह्यातील असून, तहसीलदारांच्या **(पान २ वर)**

# 'भार्गवास्त्र'ची चाचणी यशस्वी

**नवी दिल्ली :** जम्मू काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील निर्माण झालेला तणाव सध्या काहीसा कमी झाल्याचं पाहायला मिळत आहे. या तणावादरम्यान भारताने पाकिस्तानकडून होणारे सर्व ड्रोन हल्ले हाणून पाडले. भारत आपली सुरक्षा कायम मजबूत करत असल्याचं पाहायला मिळतं. आता भारताला 'भार्गवास्त्र' ही एक नवीन स्वदेशी काउंटर ड्रोन प्रणाली मिळाली आहे. 'भार्गवास्त्र'ची ओडिशामध्ये यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे.


'भार्गवास्त्र' ही ड्रोन प्रणाली एकाच वेळी अनेक ड्रोनवर मारा करण्यास सक्षम असल्याचं सांगितंल जातं. या कमी किमतीच्या काउंटर ड्रोन प्रणालीची (१४ मे) यशस्वी चाचणी घेतली असून ही ड्रोन प्रणाली वाढत्या ड्रोनच्या धोक्याला तोंड देण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचं सांगण्यात येत आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

# उद्ध्वस्त वर्तमानाच्या दाहीदिशा पुस्तकास 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार'

**पुणे :** अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे दिला जाणारा ललित विभागातील २०२४ चा उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार शब्दालय पब्लिकेशन हाऊसच्या संजय कृष्णाजी पाटील लिखित उद्ध्वस्त वर्तमानाच्या दाही दिशा पुस्तकास जाहीर करण्यात आला आहे. प्रकाशक संघाच्या आगामी पाचव्या प्रकाशक-लेखक संमेलनामध्ये पुरस्कार वितरण कार्यक्रम होणार आहे. संमेलनाच्या तारखा, स्थळ वगैरे निश्चित झाल्यावर जाहीर केले जाईल.

# पाकिस्तानी हेर 'ज्योती'ला अटक

**नवी दिल्ली :** पाकिस्तानला संवेदनशील माहिती पुरविल्याबद्दल सहा भारतीय नागरिकांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये हरियाणाच्या एका यूट्यूबर तरुणीचाही समावेश आहे. पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्यांची साखळी हरियाणा आणि पंजाबमध्ये



सक्रिय असल्याचे सुरक्षा यंत्रणांनी सांगितले आहे. या साखळीत एजंट, आर्थिक सहाय्य करणारे आणि माहिती पुरविणारे लोक कार्यरत आहेत. हिसारमधील सिव्हिल लाईन्स पोलिसांनी सहा जणांना अटक केली.

यूट्यूबर तरूणीचे नाव ज्योती मल्होत्रा असून तिचे यूट्यूबवर 'ट्रॅव्हल विथ जो' या नावाचे चॅनेल आहे.

# १५ जूनपासून महाराष्ट्रातील शाळांच्या वेळापत्रकात बदल!

## शाळा उघडण्याआधीच नवीन टाईम टेबल जाणून घ्या

**मुंबई :** पुढील महिन्यात राज्यातील शाळा सुरू होणार आहेत. १५ जून २०२५ पासून नवीन शैक्षणिक वर्ष म्हणजेच २०२५ - २६ हे नवं शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. खरंतर २०२४ २५ या शैक्षणिक वर्षाची समाप्ती फारच उशिराने झाली.

यामुळे नवीन शैक्षणिक वर्ष कधीपासून सुरू होणार राज्यातील शाळा कधी उघडणार हा मोठा सवाल विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडून उपस्थित केला जातो. मात्र महाराष्ट्र राज्य शासनाच्या शालेय विभागाने यंदा सुद्धा १५ जून पासूनच शाळा उघडतील असे जाहीर केले आहे.

दरम्यान असे असतानाच राज्यातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांसाठी तसेच पालकांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. मीडिया रिपोर्टनुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होण्याची शक्यता असून

असे झाल्यास राज्यातील शाळांमधील वेळापत्रक सुद्धा बदलेल असे बोलले जात आहे. दरम्यान आता आपण नवीन शैक्षणिक धोरण लागू झाल्यानंतर शाळांचे वेळापत्रक कसे असेल या संदर्भातील थोडक्यात माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मीडिया रिपोर्टवर जर विश्वास ठेवायचे झाले तर याची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून होणार आहे. नक्कीच हा निर्णय घेतला गेला तर याचा विद्यार्थ्यांवर आणि शिक्षकांवर मोठा परिणाम होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना ५ च्या आधीच सुट्टी मिळणार आहे.

### कस असणार शाळेचे नवीन टाइम टेबल?

मीडिया रिपोर्टनुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून शाळेचा टाईमिंग हा नऊ ते चार असा राहणार आहे. या नव्या टाईम टेबल नुसार राज्यातील सर्वच्या सर्व शाळा नऊ वाजेला भरतील आणि चार वाजेला सोडल्या जाणार आहेत.

**परिपाठ किती वाजेला होणार?**

मीडिया रिपोर्ट मध्ये जे नवीन टाईम टेबल समोर आले आहे त्या नव्या टाईम टेबल नुसार राज्यातील



शाळा आता सकाळी ९:०० वाजता भरतील, त्यानंतर ९:२५ पर्यंत परिपाठ होईल, परिपाठ झाल्यानंतर मग लेक्चर सुरू होणार आहेत.

९ वाजून २५ मिनिटांनी लेक्चर सुरू होतील आणि जवळपास अकरा वाजून पंचवीस मिनिटांपर्यंत पहिल्या तीन तासिका होणार आहेत. त्यानंतर, मग दहा मिनिटांची लहान सुट्टी राहणार आहे. लहान सुट्टी झाली की ११:३५ वाजेला शाळा भरेल आणि

त्यानंतर १२:५० पर्यंत दोन तासिका होतील. यानंतर मग जवळपास ४० मिनिटांची मोठी सुट्टी राहणार आहे. मोठी सुट्टी झाली की मग दीड पासून पुन्हा शाळा भरेल आणि ३:५५ पर्यंत तासिका होतील. दरम्यान शेवटच्या ५ मिनिटांमध्ये वंदे मातरम घेतले जाईल आणि त्यानंतर मग शाळा सोडली जाईल असे बोलले जात आहे.

# उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा

## ना .विखे पाटील : जिल्हाधिकारी कार्यालयात खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठक

**अहिल्यानगर** : शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती पद्धतीत बदल करून कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शेतीसाठी उपयुक्त माहिती शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सन २०२५ २६ खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठकीत पालकमंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार अमोल खतले, आमदार विठ्ठलराव लंबे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष बेरेकर, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अहिल्यानगरचे अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, कृषी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाबाबत सातत्याने मार्गदर्शन जमिनीची गुणवत्ता, योग्य पीक निवड, सिंचन पद्धती, खतांचे प्रमाण या बाबींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती प्रत्येक त्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी यासाठी योजनांची पुस्तिका प्रकाशित करावी. योजनांची माहिती समाजमाध्यमांडरेही द्यावी. तालुकास्तरावर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामपूर्व बैठकांचे आयोजन करून या बैठकीत तालुक्यातील आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान कराबा, या बैठकीस शेतकऱ्यांना आमंत्रित करावे. कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी संवाद साधावा, अशा सूचनाही पालकमंत्री विखे पाटील यांनी यावेळी दिल्या. गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेतील लाभाची व्याप्ती वाढवावी. शेतकऱ्यांनी पारंपरिक पीक पद्धतीत बदल करून अधिक उत्पन्न देणाऱ्या नगदी पिकांकडे वळावे यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शन करावे. प्रधानमंत्री पीक विम्याच्या नवीन लाभप्रक्रियेविषयी शेतकऱ्यांमध्ये जागृती करावी.

तक्रार निवारण यंत्रणा उभारावी, विनाशुल्क हेल्प लाईन सुरू करावी, कालबाह्य योजनांचा आढावा घेऊन कृषी आयुक्तांना अहवाल सादर




करावा. गोगलगाय, रानडुकर व बिबट्या वासारख्या प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी वनविभागाच्या मदतीने तात्काळ उपाययोजना कराव्यात, ठिबक सिंचन अनुदान वेळेत वितरित होईल याची दक्षता घ्यावी. सर्व तालुक्यातील कृषी केंद्रांची भरारी पथकाडरे अचानक तपासणी करावी, शेतकऱ्यांनी युरिया खताची मागणी केल्यास त्यांना पर्यायी खत दिले जाऊ नये, वाबाचत कृषी केंद्र चालकांना स्पष्ट सूचना द्याव्यात. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना निर्भेळ, दर्जेदार व पुरेशा प्रमाणात खते व बी-बियाणे मिळतील याची काळजी घ्यावी, अकोले तालुक्यात भाताचे बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्यावे.

प्रत्येक कृषी केंद्राबाहेर बियाणे व खते यांचा पुरवठा व शिल्लक साठा दर्शवणारा फलक लावावा. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी केंद्रांवर कठोर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या पीक पद्धतीत झालेल्या बदलांचे सांख्यिकीय परीक्षण करावे. पीक विमा पद्धतीतील बदलांची सर्वदूर माहिती व्हावी यासाठी व्यापक जनजागृती करावी. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये शेतीत होत असलेल्या नवनवीन प्रयोगांची माहिती शेतकऱ्यांना मिळावी यासाठी कृषी पर्यटन योजना सुरू करण्यासाठी कृषीमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. शेती उत्पादनाबरोबरच माल निर्यातीमध्ये जिल्हा अग्रेसर राहावा यासाठी पायाभूत सुविधा निर्माणावर भर द्यावा, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी मिळणाऱ्या विविध अनुदानातून बचत करून शेतीसाठी अत्याधुनिक

तंत्रज्ञानावर चालणारे ड्रोन खरेदी करावेत व त्याचा उपयोग उत्पादनवाढीसाठी करावा. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. खरीप हंगाम उत्साहवर्धक व चांगले उत्पन्न देणारा ठरेल. शेतकऱ्यांच्या जीवनात सुख व समृद्धी यावी, अशी अपेक्षा व्यक्त करत कृषी विभागाने सुरू केलेला मशेतकरी डॉक्टरफ उपक्रम तसेच मशेतीचा सखाफ चॅटबोट उपक्रम शेतकऱ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेस पात्र शेतकऱ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. बोराळे यांनी खरीप हंगामासाठी कृषी विभागाने केलेले नियोजन व विविध योजनांची अंमलबजावणी याचे सादरीकरण केले. यावेळी कृषर्षी पुरस्कार प्राप्त शेतकरी उपस्थित होते. या शेतकऱ्यांशीही पालकमंत्र्यांनी थेट संवाद साधला. बैठकीपूर्वी, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, मळणीयंत्र व कंबाईन हार्वेस्टरचे वितरण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत मंजुरीपत्राचे वितरणही करण्यात आले.

# सौरऊर्जेच्या माध्यमातून दिवसा वीज उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न

**बारामती** : बारामती : राज्यात पीएम-सूर्य घरः मोफत वीज योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिमिर्तीवर भर देण्यात येत आहे, आगामी काळात नागरिकांच्या वीज देयकात बचत करण्याच्यादृष्टीने दिवसा बीज उपलब्ध करुन देण्यास राज्यशासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

मुढाळे येथे महापारेषणच्या




२२०/३३ के. व्ही. उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते.

पवार म्हणाले, ग्रामीण भागातील उद्योजक, शेतकरी आणि घरगुती वापराकरिता लागणारी वीज तसेच राज्यातील वाढते औद्योगिकरण लक्षात घेता सर्व घटकांना योग्य दाबाने वीजपुरवठा झाला पाहिजे याकरीता राज्यशासनाच्यावतीने वीजेचे उपकेंद्र उभारण्यात येत आहे. शेतकऱ्यांना दिवसा बीज उपलब्ध व्हावी याकरीता याकरीता सुमारे २४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. शेतात सौर कृषी पंप देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या कृषी पंपाना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला असून सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना लाभ घेतला आहे. पीएम-सूर्य घरः मोफत वीज योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित २२०/३३ केही उपकेंद्र मुझळे ता. बारामती जिल्हा पुणे १ लाख ३० हजार घरांच्याकरीता ५०० मोंबटपेक्षा अधिक क्षमतेचे छतावर सौरसंच बसविण्यात आले आहे तसेच या योजनेअंतर्गत १ हजार कोटी रुपयापेक्षा अधिक अनुदान लाभार्थ्यांना दिले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलांनाही सोलरच्या माध्यमातून वीज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या (एआय) बापरासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

# स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून दरोडा टाकणारे तीन आरोपी जेरबंद

**जामखेड** : तालुक्यातील कुसडगाव येथे स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीला मारहाण करून त्यांच्या कडील सर्व मालमत्ता चोरण्याचा घटना घडली आहे फिर्यादी. राजेंद्र दिलीप मैड, वय ३५, रा. आश्वी, ता.संगमनेर बास महिला आरोपी अश्विनी हिने फिर्यादीस दीडशे ग्रॅम सोने दहा लाख रूपयेला असे स्वस्तात देण्याचे आमीष दाखवून दि. १४ रोजी फिर्यादी जामखेड तालुक्यातील कुसडगाव येथे बोलविले. फिर्यादी पैसे घेऊन आल्यानंतर महिला आरोपी अश्विनी व तिचे आठ ते दहा साथीदारांनी फिर्यादीस मारहाण करून त्यांचे कडील दहा लाख रूपये रोख रक्कम, सोन्याचे दागीने व मोबाईल असा मुद्देमाल जबरीने चोरून नेला. याबाबत जामखेड पोलीस स्टेशन गुरनं २६६/२०२५ बीएनएस ३१० (२) प्रमाणे दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना विकास काज्या काळे, जरेणी विकास काळे दोन्ही रा.पोंदवडी, ता. करमाळा, जि. सोलापूर, वनिता रामचंद्र पवार, रा. सरदवाडी, ता. जामखेड, सोन्या शिवाजी काळे रा. सदफडोह, ता. करमाळा, जि. सोलापूर अशांनी त्यांचे साथीदारासह केला असून ते जवळा, ता. जामखेड येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार जवळा, ता. जामखेड येथे आरोपीतांचा शोध घेऊन सोन्या शिवाजी काळे, वय २८, अभित्या शिवाजी काळे, वय ३२, दोन्ही रा. सरफडोह, ता. करमाळा, जि. सोलापूर, शुभम रामचंद्र पवार, वय १८, रा. सरदवाडी, ता. जामखेड, अशांना ताब्यात घेतले.

पान १ वरुन

### ड्रग्ज पाठोपाठ लाखो रुपयांचा गांजा पकडला

सुशिल होलगिर, राजेश सुर्यवंशी, सचिन धनाड आदींच्या पथकाने सापळा लावला.

वर्णनाप्रमाणे गाडी येताच ज्ञानेश्वर विठ्ठल जाधव, वय ४५ वर्षे, रा. दुगाव ता. चांदवड, जि. नाशिक, रमेश विठ्ठल जाधव वय. ३८ वर्षे, रा. दुगाव ता. चांदवड, जि. नाशिक यांना ताब्यात घेतले. झडती घेतली असता सदर गाडीच्या डिक्कीमध्ये गांजा सापडला. दोन्ही भावांनी मिळुन श्रीरामपूर येथे विक्री करीता आणल्याचे सांगितले.या गांजाचे वजन २०१ किलो ६०९ ग्रॅम असून त्याची किंमत ३० लाख २४ हजार १३५ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगीतले आहे. त्याच बरोबर १० लाख रुपये किमतीची

महिंद्रा कंपनीची काळया रंगाची एक्स.यु.व्ही.५०० तिचा क्रं. एम एच ०२ ई ई ६९९९ जप्त करण्यात आली आहे.असा पोलिसांनी एकूण ४० लाख २४ हजार १३५ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून दोघांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान श्रीरामपुर शहरात हा गांजा कोठे विकला जाणार होता याचा तपास पोलीस करीत आहेत. पुढील पोलीस उपनिरीक्षक रोहिदास ठोबरे हे करीत आहेत.

### श्रीरामपूरमध्ये १४ कोटींचे अमली पदार्थ जप्त

दिघीच्या दिशेने येताना दिसली. त्याची तपासणी केली असता १४ गोण्यांत पावडर व उर्वरित ७ गोण्यांत स्फटिक आढळले. वाहनचालक राशिनकर याने हे स्फटिक अल्प्राझोलम औषध असून, गोण्यांमधील पांढरी पावडर ही अल्प्राझोलम बनवण्याकरता लागणारा कच्चा माल असल्याचे सांगितले.

अल्प्राझोलम हा अमली पदार्थ असल्याने त्याची खात्री करण्याकरता फॉरेन्सिक तज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण केले. या पथकाने केलेल्या तपासणी प्रथमदर्शनी पावडर व स्फटिक हे अल्प्राझोलम हा अमली पदार्थ व त्यासाठी लागणारा कच्चा माल असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार ६ कोटी ९७ लाख ६७ हजार रुपये किमतीचे ६९ किलो ७६७ ग्रॅम वजनाच्या अल्प्राझोलम स्फटिकच्या ७ गोण्या तर ६ कोटी ७६ लाख ७४ हजार रुपये किमतीच्या ३३८ किलो ३७ ग्रॅम वजनाचे अल्प्राझोलम बनवण्याची पावडर १४ गोण्यांमध्ये आढळली. त्याच्यासह १ लाख रुपये किमतीचे वाहन असा एकूण १४ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती डॉ. शिवपुजे यांनी दिली. पोलिसांनी वाहनचालक मिनीनाथ राशिनकरकडे चौकशी केली असता विश्वनाथ शिपणकर याने तो दिल्याचे सांगितले.

### संगमनेर येथे ३८ वेठबिगार, ३१ बालकामगारांची मुक्तता

स्वाक्षरीने बंधमुक्तता प्रमाणपत्र देऊन पोलीस संरक्षणात त्यांना पालघर येथे रवाना करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे व तहसीलदार धीरज मांजरे यांच्या नेतृत्वाखाली ही मुक्तता मोहीम राबविण्यात आली. सरकारी कामगार अधिकारी, सहायक पोलीस निरीक्षक व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह १० ते १२ जणांच्या तीन पथकांच्या माध्यमातून ही धडक कारवाई करण्यात आली.

मुक्तता केलेल्या स्त्री, पुरुष व बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यानंतर प्रशासनाच्यावतीने त्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली. वेठबिगारीतून मुक्त झालेल्या कामगारांनी जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

दरम्यान, ठेकेदार श्री. राठोड यांच्याविरोधात घारगाव पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी कायदा व वेठबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, कृषी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सातत्याने मार्गदर्शन दिले जात आहे. हवामानातील बदल, जमिनीची गुणवत्ता, योग्य पीक निवड, सिंचन पद्धती, खतांचे प्रमाण या बाबींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी यासाठी योजनांची पुस्तिका प्रकाशित करावी. योजनांची माहिती समाजमाध्यमांद्वारेही द्यावी.

तालुकास्तरावर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामपूर्व बैठकांचे आयोजन करून या बैठकीत तालुक्यातील आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान करावा. या बैठकीस शेतकऱ्यांना आमंत्रित करावे. कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी संवाद साधावा, अशा सूचनाही पालकमंत्री विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.

गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेतील लाभाची व्याप्ती वाढवावी. शेतकऱ्यांनी पारंपरिक पीक पद्धतीत बदल करून अधिक उत्पन्न देणाऱ्या नगदी पिकांकडे वळावे यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शन करावे. प्रधानमंत्री पीक विम्याच्या नवीन लाभ प्रक्रियेविषयी शेतकऱ्यांमध्ये जागृती करावी. शेतकऱ्यांचे प्रश्नसोडविण्यासाठी ऑनलाईन तक्रार निवारण यंत्रणा उभारावी, विनाशुल्क हेल्पलाईन सुरू करावी. कालबाह्य योजनांचा आढावा घेऊन कृषी आयुक्तांना अहवाल सादर करावा.

गोगलगाय, रानडुकर व बिबट्या यासारख्या प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी वनविभागाच्या मदतीने तात्काळ उपाययोजना कराव्यात. ठिबक सिंचन अनुदान वेळेत वितरित होईल याची दक्षता घ्यावी. सर्व तालुक्यांतील कृषी केंद्रांची भरारी पथकाद्वारे अचानक तपासणी करावी. शेतकऱ्यांनी युरिया खताची मागणी केल्यास त्यांना पर्यायी खत दिले जाऊ नये, याबाबत कृषी केंद्र चालकांना स्पष्ट सूचना द्याव्यात. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना निर्भेळ, दर्जेदार व पुरेशा प्रमाणात खते व बी-बियाणे मिळतील याची काळजी घ्यावी. अकोले तालुक्यात भाताचे बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्यावे. प्रत्येक कृषी केंद्राबाहेर बियाणे व खते यांचा पुरवठा व शिल्लक साठा दर्शवणारा फलक लावावा. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी केंद्रांवर कठोर कारवाई करावी.

शेतकऱ्यांच्या पीक पद्धतीत झालेल्या बदलांचे सांख्यिकीय परीक्षण करावे. पीक विमा पद्धतीतील बदलांची सर्वदूर माहिती व्हावी यासाठी व्यापक जनजागृती करावी. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये शेतीत होत असलेल्या नवनवीन प्रयोगांची माहिती शेतकऱ्यांना मिळावी यासाठी कृषी पर्यटन योजना सुरू करण्यासाठी कृषीमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. शेती उत्पादनाबरोबरच माल निर्यातीमध्ये जिल्हा अग्रेसर राहावा यासाठी पायाभूत सुविधा निर्माणावर भर द्यावा, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी मिळणाऱ्या विविध अनुदानातून बचत करून शेतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर चालणारे ड्रोन खरेदी करावेत व त्याचा उपयोग उत्पादनवाढीसाठी करावा. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. खरीप हंगाम उत्साहवर्धक व चांगले उत्पन्न देणारा ठरेल. शेतकऱ्यांच्या जीवनात सुख व समृद्धी यावी, अशी अपेक्षा व्यक्त करत कृषी विभागाने सुरू केलेला ङ्गशेतकरी डॉक्टरफ उपक्रम तसेच ङ्गशेतीचा सखाफ चॅटबोट उपक्रम शेतकऱ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेस पात्र शेतकऱ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. बोराळे यांनी खरीप हंगामासाठी कृषी विभागाने केलेले नियोजन व विविध योजनांची अंमलबजावणी याचे सादरीकरण केले. यावेळी कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी उपस्थित होते. या शेतकऱ्यांशीही पालकमंत्र्यांनी थेट संवाद साधला.

बैठकीपूर्वी, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, मळणीयंत्र व कंबाईन हार्वेस्टरचे वितरण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत मंजुरीपत्राचे वितरणही करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |


**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari :
The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization


Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Digital India
Vision India
MAKE IN INDIA
MSME



Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# पीओके सोडा, मगच चर्चा शक्य



**नवी दिल्ली :** दहशतवाद आणि चर्चा एकाचवेळी होऊ शकत नाही. दहशतवाद आणि व्यापार एकाचवेळी होऊ शकत नाही. पाणी आणि रक्त एकाचवेळी वाह शकत नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला ठणकावून सांगितलं. पाकिस्तानसोबत चर्चा केवळ दहशतवादी आणि पाकव्याप्त काश्मीरवरुनच होईल, ही बाब मोदींनी निक्षून सांगितली. पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीर (पीओके) परत मिळवणे हेच आमचे लक्ष्य आहे. आधी 'पीओके' आमच्या ताब्यात द्या; मगच पाकिस्तानशी चर्चा होऊ शकते, अशी रोखठोक भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडली. यासंदर्भात तिसऱ्या कोणाच्याही मध्यस्थीची गरज नाही, असे सांगत त्यांनी अमेरिकेच्या मध्यस्थीचा प्रस्ताव फेटाळला आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर' हे लोकभावनेचं प्रतिबिंब

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी निर्दोष, निष्पाप नागरिकांना निघृणपणे संपवलं. दहशतवाद्यांनी क्रोर्याची परिसीमा गाठली. त्याचा समाजातील सगळ्याच स्तरातून निषेध झाला. दहशतवाद्यांविरोधात सगळ्यांचा सूर सारखाच होता. आम्ही दहशतवाद्यांना उद्धस्त करण्यासाठी सैन्याला पूर्ण सवलत दिली. त्यानंतर सैन्यानं अतुलनीय शौर्य दाखवत कारवाई केली. आता दहशतवाद्यांना सिंदूर पुसण्याची किंमत समजली असेल, ऑपरेशन सिंदूर हे केवळ नाव नाही. हे कोट्यवधी लोकांच्या भावनांचं प्रतिबिंब आहे. ऑपरेशन सिंदूर न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे. ६ मेच्या रात्री उशिरा, ७ मेच्या पहाटे या प्रतिज्ञेचा परिणाम पाहिला आहे.

भारताच्या कारवाईनंतर पाकिस्तान वाचण्यासाठी प्रयत्न करु लागला. त्यासाठी जगभर फिरला. १० मेला पाकिस्तानी सैन्यानं आपल्या डीजीएमओशी संपर्क साधला आणि शस्त्रसंधीसाठी विनंती केली. त्याच्या आधी भारतीय सैन्यानं केलेल्या कारवाईत दहशतवाद्यांची मुख्यालयं, लॉन्च पेंड उद्धस्त केले होते. त्यांचे अड्डे जमीनदोस्त केले होतं. त्यामुळे पाकिस्ताननं विनंती केल्यानंतर आम्ही त्याबद्दल सकारात्मक विचार केला. आम्ही पाकिस्तानी दहशतवादी तळ, सैनिकी तळांवरील कारवाई स्थगित केलीय. ती पूर्णपणे थांबवलेली नाही. आम्ही त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहोत, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.

पाकिस्तानने पुन्हा आगळीक केली, तर भारताकडून त्यांना दिले जाणारे उत्तर अत्यंत विध्वंसक आणि मजबूत असेल. 'अगर वहाँसे गोली चलेगी, तो यहाँसे गोला चलेगा, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला ठणकावले.

# 'नीरज'ला टेरीटोरियल आर्मीमध्ये मानद लेफ्टनंट कर्नल पद



**नवी दिल्ली :** भारताचा आलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा याला टेरिटोरियल आर्मीमध्ये मानद लेफ्टनंट कर्नल पद बहाल करण्यात आले आहे. या मानाच्या घोषणेसह तो भारतीय सैन्याच्या सन्माननीय अधिकाऱ्यांच्या यादीत सामील झाला आहे.

नीरज चोप्राच्या या पदोन्नतीची अधिकृत घोषणा भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित करण्यात आली. भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्याचे योगदान, शिस्त आणि देशसेवेची भावना लक्षात घेऊन त्याला हा सन्मान देण्यात आला आहे. नीरजने २६ ऑगस्ट २०१६ रोजी राजपूताना रायफल्समध्ये नाईब सुभेदार म्हणून भारतीय लष्करात प्रवेश केला होता. टोकियो ऑलिंपिक २०२१

### एम.एस. धोनी आणि कपिल देव यांच्या पंक्तीत सामील

मध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर त्याची सुभेदार पदावर आणि नंतर २०२४ मध्ये सुभेदार मेजर पदावर पदोन्नती करण्यात आली. त्याच्या या पदोन्नतीमुळे तो माजी क्रिकेटपटू एम.एस. धोनी आणि कपिल देव यांच्या पंक्तीत सामील झाला आहे. ज्यांना याआधी टेरिटोरियल आर्मीमध्ये सन्माननीय पदे बहाल करण्यात आली आहेत. नीरज सध्या आपल्या क्रीडा प्रवासातही आघाडीवर आहे. तो १६ मे २०२५ रोजी कतारमधील दोहा डायमंड लीग स्पर्धेत आणि २३ मे रोजी पोलंडमधील ओरलेन जानुष कुसोचिस्की मेमोरियल स्पर्धेत सहभागी होणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात आयोगाकडून कायदेशीर पडताळणी

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कशा घ्यायच्या यावर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतरही संभ्रम कायम आहे. न्यायालयाने निकालपत्रात राज्यातील २०२२ आधीची स्थिती आणि त्याअनुषंगाने आरक्षण लागू करून निवडणुका घ्याव्यात, असे म्हटले आहे. त्यामुळे याविषयीची स्पष्टता येण्यासाठी राज्य निवडणूक आयोग कायदेशीर सल्ला घेत आहे. तसेच, आयोगाने राज्य सरकारला वॉर्ड फेररचना करण्याची प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले असून, पुढील ४० दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर गेल्या काही वर्षापासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुकांवर ६ मे रोजी सुनावणी घेण्यात आली. यासंदर्भात राहुल वाय, पवन शिंदे व इतरांनी सादर केलेल्या याचिकांची एकत्रित सुनावणी न्या. एन. के. सिंह आणि न्या. सूर्य कांत यांच्या खंडपीठासमोर झाली. त्यावेळी या निवडणुकांसाठी चार आठवड्यांत अधिसूचना काढावी व चार महिन्यांच्या आत निवडणुका घ्याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. न्यायालयाच्या निकालाची प्रत मंगळवारी रात्री उपलब्ध झाली. निकालात २०२२ साली बांठिया आयोगाचा अहवाल सादर करण्याआधीची स्थिती आणि त्याअनुषंगाने आरक्षण द्यावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग २०२२ आधीची राज्यातील आरक्षणाची स्थिती काय होती, त्यानुसार प्रत्येक जिल्हावार आरक्षणाची स्थितीची विस्तृत माहिती घेणार आहे.

### डी गुकेशला पराभवाचा धक्का

**रोमानिया :** विद्यमान वर्ल्ड चॅम्पियन डी गुकेशला फ्रान्सच्या मॅक्झिम वॉशियर लॅग्रेव्हकडून सुपरबेट क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेच्या चौथ्या फेरीत धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला. गुकेशला येथे अग्रमानांकन मिळाले असून तोच संभाव्य विजेता असल्याचे मानले जात आहे.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# शाळेत दिवसांतून तीन वेळा होणार विद्यार्थ्यांची हजेरी

**मुंबई :** बदलापूर घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षा संदर्भात न्यायालयाच्या आदेशानुसार माजी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीकडून आलेल्या सूबनेनुसार राज्यातील सर्व शाळांना विद्याष्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काही निर्देश जारी करण्यात आले आहेत.

शाळेतील मुलांच्या उपस्थिती संदर्भात सकळी, दुरारी आणि शाळा सुटण्याच्या बेळेस संध्याकाळी हजेरी नोंदविण्यात यावी अनुपस्थित विद्यार्थ्यांबावर त्यांच्या अग आणि इतर प्रकारच्या नियमावली जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यात शाळेच्या दृश्यमान भागात शाळेच्या अंतर्गत संरक्षण मितीकर आणि शाळेच्या इमारतीवर विद्यार्थ्यांना सुरक्षिततेबद्दल माहिती देण्यासाठी माहितीचे फलक, चित्रे किंवा डिजिटल डिस्प्ले बोर्ड वापरून प्रदर्शित: केले जावेत.

सर्व शाळांना चोहोबाजूंनी भिंती आणि मुख्य प्रवेशद्वार असावे. मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक अलावा शाळेच्या परिसरामध्ये कोणतीही अनधिकृत व्यक्ती प्रवेश करणार नाही याची दक्षता घ्यावी, विद्यार्थी शाळेच्या परिसरात उपस्थित असताना त्याच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी शाळेची राहील. शाळा व्यवस्थापनाने शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्याबरोबर बैठक आयोजित करुन सुरक्षेच्या दृष्टिने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

शाळेतील प्रसाधनगृह / स्वच्छतागृहांबाबत :

प्रत्येक शाळेत मुली आणि मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असावीत, मुलींसाठी स्वच्छतागृहाजवळ एक महिला परिचर तैनात केली जावी. त्याबप्रभान मुलांसाठी स्वच्छतागृहाजवळ एक परिचर तैनात केला जावा, स्वच्छतागृहांची स्वच्छता राखली जावी, मर्व स्वच्छतागृहांमध्ये पाणी आणि लाईटनी उपलब्धता असावी. विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाचे दरवाजे उघडणे बंद करणे सोयीचे असावे.

टोल फ्री चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक १०९८ (किंवा बदललेला नवीन क्रमांक) एका प्रमुख ठिकाणी प्रदर्शित केला जावा, जिथे मुले तो नोंदवु शकतील. या क्रमांकावर कधी आणि कोणत्या परिस्थितीत संपर्क साधता येईल याची माहिती मुलांना देण्यात यावी.

कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी :

प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी करताना त्यांची भूमीपू सेवा, त्याची कोटुंबिक पार्श्वभूमीप अहवाल पोलीस यंत्रणेमार्फत प्रासकरून घेणे आव वातीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस क देण्यात यावी, कर्मचाऱ्यांची नेटवर्क सिस्टिम्ससारख्या तंवर आधारित करण्यात यावा नेमणुकीनंतर एखाद्या कर्मचाऱ्याची फगुन्द्राशी संबंधित असल्याचे निदर्शनास आल्यास, त्यास तात्काळ सेवेतून कमी करण्यात यावे शाळेतील वाहतूक सुरक्षा, व्यवस्थापन तसेच संस्थेकडून नेमण्यात यावा,कर्मचायांची पोलिसांकडूनचापी प्रमाणपत्र घेण्यात यावे.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021